## भेदभावाविरुद्धचा हक्क

समान वागणुकीचा हक्क हा मूलभूत मानला जातो. मात्र सरकारच्या अधिपत्या अंतर्गत असलेल्या संस्थां संदर्भातच तो राबवला जाउ शकतो. खाजगी व्यक्ती वा संस्थां बाबतीत तो लागू होत नाही. लिंग, धर्म, जात, वर्ण, जन्म/वंश अथवा जन्मस्थानावर आधारित कुठल्याही कारणास्तव कुठल्याही शासकीय संस्थेकडून, कुठल्याही व्यक्ती विरुद्ध सामाजिक अथवा व्यावसायिक भेदभाव होणार नाही अशी कायद्यात तरतूद आहे.

- सार्वजनिक आरोग्याचा हक्कही मूलभूतच आहे आणि हा हक्क सर्व माणसांना राबवता येईल अशी व्यवस्था करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. एच.आई.वी. बाधित व्यक्तींना वैद्यकीय उपचार वा इस्पिळात प्रवेश हवा असेल तर तो नाकारता येणार नाही. जर उपचार नाकारण्यात आले तर कायद्यात या संबंधी उपाय आहेत.

- एखादी व्यक्ती केवळ एच.आई.वी. बाधित आहे या कारणास्तव नोकरीतही त्याच्या बाबतीत भेदभाव करता येणार नाही. सतत आणि दीर्घ काळ आजारी असलेल्या माणसाला नोकरीवरुन काढून टाकता येते. पण एच.आई.वी. बाधित असूनही ज्याच्यापासून बरोबरच्या इतर सहकाऱ्यांना कुठलाच धोका नाही अशा, एखी कर्तव्यतत्पर आणि कर्तव्यदक्ष व्यक्तीला नोकरीवरुन काढता येणार नाही. अशा परिस्थितीत नोकरीवरुन काढून टाकण्यात आले तर त्या माणसाला कायद्याची मदत घेता येते.

तर थोडक्यात -

सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याची गोष्ट असो वा निवारा नाकारला जाण्यासारखी गंभीर बाब असो, सर्वांना समान वागणुकीचा हक्क आहे. हा हक्क सर्वांना राबवता येईलच अशी व्यवस्था करण्यासाठी, संपूर्ण कायदा व्यवस्था तुमच्या पाठीशी आहे.


**एच.आई.वी./एड्स ग्रस्थांसाठी कायदेशीर हक्क व सल्ला लॉयर्स कलेक्टिव्ह एच.आई.वी./एड्स विभाग हि संस्था मोफत चालवते. अधिक माहिती साठी संपर्क करा**

- तळ मजला, जलाराम कृपा, ६१, जन्मभूमि मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
  दूरध्वनी : ०२२-२२८७५४८२ / ३, २२८३२७७९ फैक्स : ०२२-२२८२१७२४
  ई-मैल : aidslaw@lawyerscollective.org
- ६३/२, मस्जिद रोड, पहिला माळा, जंगपुरा, नई दिल्ली -१४.
  दूरध्वनी : ०११-२४३७७१०१/२/२२३७ फैक्स : ०११-२४३७२२३६
  ई-मैल : aidslaw1@lawyerscollective.org
- पहिला माळा, ४ए, एम. ए. हुसैन रोड, ऑफ पार्क रोड, टस्कर टाऊन, शिवाजी नगर, बैंगलोर-५६० ०५१
  दूरध्वनी : ०८०-४१२३९१३० / १ फैक्स : ०८०-४१२३९२८९ -
  ई-मैल : aidslaw2@lawyerscollective.org

वेबसाईट : www.lawyerscollective.org


# आपण एच.आई.वी./एड्स ऋग्ण आहात काय ?



# हक्कांची माहिती करून घ्या

## आपले मूलभूत हक्क

भारतात कायद्याने सर्वच माणसांना मूलभूत हक्क दिलेले आहेत. एवादी व्यक्ती विशिष्ठ



धर्माची, वर्णाची, लिंगाची आहे वा एका ठिकाणी जन्मलेली आहे म्हणून जसा यात काही फरक पडत नाही, त्याचप्रमाणे एवादी व्यक्ती केवळ एच.आय.वी. बाधित असल्यामुळे, तिला हे हक्क नाकारता येत नाहीत. आपल्या मूलभूत, हक्कांची जाणीव असणं अत्यंत आवश्यक आहे. या हक्कांची पायमल्ली होत असेल तर त्याविरुद्ध कारवाई करु शकतो हे माहित असलं पाहिजे. एच.आई.वी. संदर्भातील महत्वाच्या तीन हक्कांविषयीची माहिती येथे मिळेल.

## जाणत्या संमतीचा हक्का

संमती म्हणजे मूलत: एखाद्या गोष्टीबद्दल मतैक्य होणे. कायद्याच्या परिभाषेत संमतीचा अर्थ, दोन व्यक्तींची एकाच गोष्टीबाबत एकाच अर्थाने झालेली सहमती.

- संमती, 'स्पष्ट' 'उघड' असू शकते-म्हणजे उच्चारांनी वा लिखित शब्दांनी दिलेल्या मान्यतेप्रमाणे किंवा कृतीतून, वर्तनातून व्यक्त होणाऱ्या मान्यतेप्रमाणे 'गर्भित' असू शकते. उदा. मान हलवून सुचवलेली मान्यता.
- जी संमती एकाच वेळी अनेक बाबींविषयी असते, तिला सर्वसाधारण संमती म्हणता येईल. तसेच विशिष्ठ बाबतीत विशिष्ठ घेतलेलीही संमती असू शकते.
- "संमती स्पष्ट, स्वतंत्र असायला हवी." जेव्हा बळजबरीनं, चुकीनं, चुकीचा अर्थ लागल्यानं अफरातफरीने अथवा अनुचित मार्गानं वा प्रभावाखाली संमती दिली जाते तेव्हा ती स्वच्छ, खरी संमती नसते.




- संमती "जाणती" ही हवी. विशषत: डॉक्टर-रोगी या नात्यात तर ही गोष्ट फारच महत्वाची आहे. डॉक्टर अधिक जाणतो आणि रोगी त्याच्यावर पूर्ण विश्वास टाकतो. वैद्यकीय उपचारातील कुठलीही प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी, त्या प्रक्रियेतील संभाव्य धोके आणि इतर पर्यायांची उपलब्धता याविषयी माहिती, प्रत्येक डॉक्टरने रोग्याला द्यायलाच हवी. ही माहिती मिळाल्यावर, उपचारांची एखादी प्रक्रिया आपल्याला मान्य आहे व नाही याबदल रोगी जाणीवपूर्वक निर्णय घेऊ शकतो.
- इतर अनेक आजारांपेक्षा एच.आई.वी. चे गर्भित परिणाम फार वेगळे आहेत. त्यामुळे एच.आई.वी. चाचणीसाठी रोग्याची "विशिष्ठ" आणि "जाणती" संमती हवी. निदान होण्यासाठी केलेल्या दुसऱ्या कुठल्या चाचणीसाठी दिलेली मान्यता, ही एच.आई.वी. चाचणीसाठी दिलेली गर्भित मान्यता म्हणून गृहीत धरणं चुकीचं आहे. या बाबतीत जाणती संमती घेतली नसेल तर तुमच्या हक्कांची पायमल्ली झालेली असणं शक्य आहे. त्याविरुद्ध तुम्ही न्यायालयाचे दरवाजे ठोठावू शकता.

कुठल्या चाचण्या आणि औषध तुम्हाला घ्यायला सांगितली आहेत, याची तुमच्या डॉक्टरकडे निश्चितपणे चौकशी करा. त्यामुळे तुमच्या आरोग्यबद्दल तुम्हाला जास्त काही समजू शकेल. बहुतेक डॉक्टर्स तुमच्या सहकार्यासाठी वेळ काढतील. ते त्यांच कामच आहे.

## गुप्ततेचा हक्क

एखाद्या गुपिताप्रमाणे काही विशिष्ठ माहिती फक्त स्वत:शीच ठेवण्याचा हक्क म्हणजे गुप्ततेचा हक्क !



- जेव्हा संपूर्ण विश्वासावर आधारित एखाद्या गोपनीय नात्यात एखादी गोपनीय/खाजगी माहिती एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीला दिली जाते तेव्हा गोपनीयता संभवते. अशा नात्यात जर गोपनीय माहिती दिली गेली असेल तर ती गुप्तच राखली गेली पाहिजे.
- जिच्यावर तुमचा विश्वास आहे, अशा एखाद्या व्यक्तीला तुम्ही खाजगीत आणि गुप्त राखण्यासाठी एखादी गोष्ट सांगितलीत आणि तिने ती दुसऱ्या व्यक्तीला सांगितली, तर गुप्ततेचा भंग झाला असा अर्थ होतो.
- रोगी आणि त्यानं दिलेल्या माहितीबाबत संपूर्ण गुप्तता राखणं हे कुठल्याही डॉक्टरचं प्रथम कर्तव्य आहे. जर तुमच्या गुप्ततेचा भंग होण्याची शक्यता उद्भवली वा भंग करण्यात आली, तर नुकसान भरपाईसाठी न्यायालयात जाण्याचा तुम्हाला हक्क आहे.
- आपण एच.आई.वी. असणं समाजात उघड होईल, या भीतीपोटी कित्येकजण न्यायालयात जायला घाबरतात. परंतु खरी ओळख दडपून, वेगळया नावाने ते दावा दाखल करू शकतात. या हितकरी धोरणामुळे एच.आई.वी. बाधित व्यक्तींना सामाजिक बहिष्कार वा भेदभावपूर्ण वागणुकीची भीती न बाळगता न्याय मागता येतो.